जा.क्र.:माध्य-३/प्रथम मान्यता/पुणे
विभाग/१९९४
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे - १. यांचे कार्यालय.
दिनांक : 24 MAR 1994

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे.

विषय - प्रथम मान्यता
कै. लक्ष्मीबाई नांदगुडे हाय. पिंपळे निलख पुणे २७

संदर्भ - आपले पत्र जा.क्र. शिक्षण/माध्य/ह-४/९३-९४/८ की मान्यता दि. २२.२.९४

वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२, ३.३ अन्वये कै. ~~बाबासाहेब चव्हाण शि.प्र.मं. पिंपळे निलख~~ संस्थेच्या मराठी माध्यमिक शाळेच्या इ. ८वी/९वी/१०वी च्या वर्गास सन १९९२ - १९९३ या शैक्षणिक वर्षासाठी जुन १९९२ पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींच्या पूर्ततेस अधीन राहून देण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करीत आहे किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठविताना खालील अटी पूर्ण केल्या आहेत किंवा कसे याबाबतही अहवाल प्रस्तावा सोबत पाठविण्यात यावा.

१) संस्थेने मालकीची शैक्षणिक दृष्ट्या योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन द्यावी.
२) मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३) स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानिशी उपलब्ध करुन द्यावी.
४) स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दरवर्षी अधिक ग्रंथाची भर घालावी.
५) विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन द्यावे.
६) पुरेसा प्रशिक्षित वर्ग उपलब्ध करुन द्यावा.
७) स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करुन द्यावी.
८) वाढीव फीचे दर मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कडून मंजूर करुन घ्यावेत.
९) शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०) कर्मचाऱ्यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.
११) शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२) विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
१३) विद्यार्थी संख्या वाढवावी.
१४)

स्वाक्षरीवर शि.उ.सं. यांची सही आहे
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे - १.

प्रत :- मुख्याध्यापक,
कै. लक्ष्मीबाई नांदगुडे हाय पिंपळे निलख, पुणे -२७